CoverageReport: TCS IT Wiz – Nagpur Edition

**Publication:** Tarun Bharat
**Date:** 21/09/2014
**Edition:** Nagpur
**Page No:** 13
**Headline:**Center Point School wins TCS IT WIZ

# सेंटर पॉईंट स्कूलला टीसीएस आयटी विझचे विजेतपद

## महाअंतिम फेरीसाठी नागपूरचे प्रतिनिधित्व करणार



राजन बंडोपाध्याप यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना विजेता चमू

तभा वृत्तसेवा
नागपूर, २० सप्टेंबर

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे आयोजित टीसीएस आयटी विझ-२०१४ चे विभागीय विजेतपद काटोल रोड स्थित सेंटर पॉईंट स्कूलने पटकाविले. सेंटर पॉईंट स्कूलचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनिरुद्ध मोरारका आणि शॉविक डे यांनी इतर प्रतिस्पर्ध्यांना प्रत्येक फेरीमध्ये मात देत स्पर्धेमध्ये अव्वल स्थान पटकाविले. विभागीय फेरीचे विजेतेपद पटकावणारी चमू आता महाअंतिम फेरीसाठी पात्र ठरली आहे.

मागील वर्षाचा उत्तम प्रतिसाद पाहता यंदा देखील टीसीएसने डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह येथे स्पर्धेचे आयोजन केले होते. यंदा स्पर्धेमध्ये सुमारे ८५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विभागीय फेरीमध्ये एसएफएस ज्युनिअर कॉलेजचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राहुल भगत आणि दिनेश नायर यांनी कडवी झुंज दिली.

यावेळी सर्व सहभागी झालेल्या स्पर्धकांना टीसीएस, बीपीएस सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष आणि ग्लोबल एचआर हेड राजन बंडोपाध्याय यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

स्पर्धेदरम्यान घेण्यात आलेल्या ट्विटर स्पर्धेमध्ये तब्बल ४२०० विद्यार्थ्यांनी ट्विट केले. यामध्ये दोन विजेत्यांना देखील पुरस्कार देण्यात आले.

सर्व १४ शहरांमधून सर्वात जास्त ट्विट मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला महाअंतिम फेरी पाहण्यासाठी मुंबईची सहल मोफत करता येणार आहे.

स्पर्धेमध्ये विविध शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.